एका मिनिटात आयुष्य बदलू शकत नाही.मात्र एक मिनिट विचार करुन घेतलेला निर्णय आयुष्य बदलू शकतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ३१ जानेवारी २०२५ | अंक५३ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# मनोज जरांगे पटलांच्या उपोषणाला मोठं यश!

## सरकारकडून ४ महत्त्वाच्या मागण्या मान्य

### मनोज जरांगेंच्या चार मागण्या मान्य


१) कुणबी नोंदणी शोधण्यासाठी माजी न्यायमूर्ती शिंदे समितीला मुदतवाढ देण्यात येईल.

२) हैदराबाद, बॉम्बे, सातारा गॅझेट लागू करण्याबाबत माजी न्यायमूर्ती शिंदे समितीकडून अभ्यास करण्यात येईल व त्यानुसार शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३) महाराष्ट्रातील मराठा आंदोलकावर दाखल झालेल्या केसेस, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासन निर्णयानुसार तपासून मागे घेण्याच्या कारवाईस गती देण्यात येईल.

४) कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्थापन केलेल्या कक्षामार्फत कार्यवाही यापुढे चालू राहील.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेले उपोषण आज स्थगित करण्यात आले आहे.
मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी २५ जानेवारी २०२५ पासून उपोषणाचे हत्यार उपसलं होतं. मनोज जरांगे हे सातव्यांदा उपोषणासाठी बसले होते. त्यांनी आंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले होतं. गेल्या ६ दिवसांपासून सुरु असलेले हे उपोषण आज अखेर स्थगित करण्यात आले आहे.
विशेष म्हणजे मनोज जरांगे यांच्या उपोषणाला मोठं यश मिळालं आहे. त्यांच्या अनेक मागण्यांपैकी चार मागण्या सरकारने मान्यही केल्या आहेत.
मनोज जरांगे यांनी सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, सगे सोयरे अंमलबजावणी तातडीने करा, शिंदे समितीला तातडीने मुदतवाढ द्या, कक्ष सुरू करा, वंशावळ समिती गठीत करा, शिंदे समिती मनुष्यबळ वाढवा, संख्याबळ द्या,नोंदी सापडलेल्या लोकांना प्रमाणपत्र द्या, अशा मागण्या त्यांनी सरकारपुढे ठेवल्या होत्या. यातील काही मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. याचे पत्र हाती लागले आहे. त्यानुसार मनोज जरांगेंच्या चार मागण्या मान्य करण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे.मी आंदोलन स्थगित करत आहे, संपवत नाहीआम्ही सगे-सोयरेंचा विषय सोडणार नाही. त्यावर आक्षेप असल्याने साध्य होत नाही पण २ ते ३ महिन्यात ते करा. आता केलं नाही तर नंतर मुंबईला जाऊ. मी पावणे दोन वर्षे झाले सर्व सहन करत आहे. मी आंदोलन स्थगित करत आहे, संपवत नाही. मला १०० टक्के वाटते की फडणवीस मराठ्यांशी बेई मानी



करणार नाहीत, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. शिंदे समितीचे काम बंद झाले होते. ती समिती लगेच सुरू करावी. त्यात किचकट अटी घालू नका. शिंदे समिती केवळ मराठवाडा नाही, तर राज्यभर काम करणार आहे. बीड आणि धाराशिव जिल्हाधिकारी यांना बडतर्फ करण्यात यावे. वंशावळ समिती गठीत करा. मोडी लिपी अभ्यासकांना सरकारने पैसे न दिल्याने काम बंद केले होते. त्यामुळे मोडी अभ्यासक नेमा. त्र्यंबकेश्वर, राक्षस भवन अभिलेख तपासा. आंदोलकांवर दाखल झालेल्या केसेस परत घ्या. Ews च्या मुलांनी जे ॲडमिशन घेतले ते तसेच ठेवावे, अशा अनेक मागण्याही मनोज जरांगेंनी बोलून दाखवल्या.

## माजलगावात शहर पोलिसांनी देशी विदेशी दारू घेऊन जाणारा पकडला



माजलगाव-(प्रतिनिधी) माजलगाव शहर हद्दीमध्ये इसम नामे नारायण रामभाऊ अलझेंडे रा. पातरूड तालुका माजलगाव हा त्याचे मोटरसायकलवर देशी दारू व विदेशी दारूची वाहतूक करताना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन देशी दारू व विदेशी दारू ११,६८०/- रु व मोटरसायकल किंमत ४०,०००/- असा एकूण ५१,६८०/- रु चा माल मिळुन आल्याने तो दोन पंचा समोरक्ष जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनीत कॅावत सो., मा.अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, मा.अपर पोलीस अधीक्षक धीरज कुमार, पो.नि. राहुल सूर्यतळ यांचे मार्गदर्शनाखाली झड्ख माकने,कउ १६८० नांगरे, महेश चव्हाण, पोशि२२९९ थापडे, यांनी केली आहे अशी माहिती माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहून सूर्यतळ यांनी दिल

## चादरही फाटली आणि पदरही फाटलाय

### आता गुंडगिरी, माफियागिरी आणि खंडणीवसुली करणाऱ्यांना पांगरूनही मिळणार नाही अन् पदरातही घेतलं जाणार नाही–अजित पवार

पक्ष संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी शिस्तीत आणि लोकांना अभिप्रेत असलेले चांगले काम केले पाहीजे. खंडणीवसूली, गुंडगिरी, भाईगिरी करणाऱ्यांना बिलकुल थारा दिला जाणार नाही. एवढ्यावेळेस पदरात घ्या, एकदा चुकीवर पांगरून टाका असे कोणीच म्हणायचे नाही. कारण चादरही फाटली आणि पदरही फाटलाय या भाषेमध्ये बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पहिल्यांदा बीड जिल्ह्यात आलेल्या अजितदादांनी चांगलाच दम भरलाय. बीड जिल्ह्यातील राजकारणामध्ये घडत असलेल्या घडामोडी आणि होत असलेले आरोप यामुळे महायुतीच्या सरकारमध्ये बीड जिल्ह्याच्या दोन मंत्र्यांना बीडचे पालकमंत्रीपद देणे टाळून स्वतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पालकमंत्री म्हणून बीडची जबाबदारी घेतली. पालकमंत्री म्हणून अजितदादा गुरूवारी पहिल्यांदा बीडमध्ये आले. सकाळीच बीडमध्ये पोहचलेल्या पालकमंत्र्यांनी पहिला संवाद पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी साधत त्यांच्या स्वागताचा स्विकार केला. बीडमधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यालयात हा संवाद झाल्यानंतर अजित पवारांनी आपल्या कामाची पद्धत नव्हे तर खाक्या दाखवला. सत्कार घेतल्यानंतर त्यांनी गुंडगिरी, दादागिरी, खंडणीखोरी करणारे कार्यकर्त्यांची गय केली जाणार नाही अशी तंबी भरली. गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या लोकांवर मकोका लावण्यासाठी मी सुचना देईल असे त्यांनी सांगितले. लोकांना अभिप्रेत असलेले राजकारण झाले पाहीजे, पक्षाला नव्हेतर पक्षाची धेय धोरणे समजून घेवून काम करणारा कार्यकर्ता निर्माण झाला पाहीजे असे सांगतानाच अजित दादा म्हणाले की, चुका करून पदरात घ्या, एवढ्या वेळेस पांगरून टाका असे कोणीही म्हणायचे नाही. कारण चादरही फाटली आणि पदरही फाटलाय आता जिल्ह्यात चांगले वातावरण निर्माण होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचाय असे देखील ते म्हणाले. सत्कार केले, मुर्त्या भेट दिल्या म्हणजे दादा आपलेच असे कोणीही समजू नये अशी तंबी देखील अजित दादांनी दिली. लोकसभा निवडणुकीत आणि विधानसभा निवडणुकीत ज्यांनी महायुतीच्या उमेदवारा विरोधात काम केले आहे त्यांनी आता तरी सुधारावे असा संदेशही त्यांनी यावेळी दिला

## आ. विजयसिंह पंडित, आ. नमिता मुंदडांची नियोजन समितीवर वर्णी



बीड । प्रतिनिधीः-बीड जिल्ह्यात नियोजन समितीच्या बैठकीसाठी येत असताना पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील राजकीय नियोजनाला सुरुवात केली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या विधीमंडळ सदस्यांमधून नाम निर्देशित करायच्या दोन सदस्यांमधून राष्ट्रवादीच्या कोट्यातून आ. विजयसिंह पंडित तर भाजपच्या कोट्यातून आ. नमिता मुंदडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.राज्यात महायुती सरकार आल्यानंतर राज्यातील सर्वच नियोजन समित्यांवरील नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळे नियोजन समित्यांवर केवळ पालकमंत्री, जिल्हाधिकारी हेच राहिले होते. आता बीड जिल्हा नियोजन समितीवर विधीमंडळ सदस्यांमधून नामनिर्देशित करायच्या दोन जागांवर गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित, केजच्या आमदार नमिता मुंदडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप आणि राष्ट्रवादीच्या जुन्या विधानमंडळ सदस्यांना हा धक्का मानला जात आहे.

इतर आमदारांचे काय ?

जिल्हा नियोजन समितीचे पालकमंत्री हे पदसिध्द अध्यक्ष असतात. तर शहरी आणि ग्रामीण क्षेत्रातून काही जागा निवडणूकिने भरल्या जातात. समितीवर विधानमंडळ सदस्यांमधून दोन सदस्य तर नियोजनाचा अभ्यास असलेले १२ सदस्य नामनिर्देशित केले जातात. यांना समितीचे सदस्य म्हणून सर्व अधिकार असतात. जिल्ह्यातील इतर सर्व लोकप्रतिनिधी (आमदार, खासदार) हे नियोजन समितीच्या बैठकीसाठी विशेष निमंत्रित असतात. मात्र ते समितीचे सदस्य नसतात. मतदानाची वेळ आली तर विशेष निमंत्रितांना त्यात सहभागी होता येत नाही, नामनिर्देशित सदस्य मात्र सहभाग घेऊ शकतात. त्यामुळे नामनिर्देशित विधानमंडळ सदस्यांचे नियोजन समितीत वजन काहिसे अधिक वाढलेले असते.

## लोकआरंभच्या दणक्याने आखेर केज प.स.ला आली जाग ,केज पंचायत समितीचे फर्निचर वर्षेभर धुळखात पडुन असल्याची बातमी प्रसिद्ध होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात




केज / प्रतिनिधी :-
केज पंचायत समिती मध्ये गेल्या वर्षभरापासून फर्निचर धुळखात पडल्याची बातमी आमच्या दैनिक लोकआरंभ यांनी वर्तमानपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की गेल्या वर्षभरापासून लाखो रुपयांचे फर्निचर पंचायत समितीच्या आवारात धुळखात पडलेले होते यावर गुटखा पान मसाला खाऊन पिचकारी मारून व रिकाम्या पाण्याच्या बाटल्या टाकून फर्निचरचे नुकसान होत असल्याचे आमच्या निदर्शनास आल्याने आम्ही आमच्या चॅनल व वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध करताच पंचायत समिती कार्यालयाचे कर्मचारी व गुत्तेदार यांनी तात्काळ बातमीची दखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याचे निदर्शनास आले.यामुळे लाखो रुपयाचे फर्निचर सामान आता वापरात येत असल्याने नागरिकांतून न्युज चॅनल व वर्तमानपत्रातून बातमी प्रसिद्ध केलेल्या संपादक व पत्रकार बांधवांचे आभार व्यक्त केले जात आहे.

# साररवं परळी परळी करु नका!पंकजा मुंडेंनी फटकारलं, म्हणाल्या थेट फाशीची शिक्षा!

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातील एक आरोपी अद्याप फरार आहे. यासोबत गेल्या काही दिवसांपासून बीडमधील अनेक गुन्हेगारीच्या घटना समोर येत आहेत. बीडमधील अनेक जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर बीडचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कडक शब्दात इशारा दिला आहे. जर कोणी खंडणी मागितली तर त्यांची गया केली जाणार नाही. जर कुणी खंडणी मागितली तर, मी त्याला मकोका लावायला मागे-पुढे पाहणार नाही, असे अजित पवार म्हणाले होते. आता यावर पर्यावरण मंत्री पकंजा मुंडे यांनीही भाष्य केले आहे.
पंकजा मुंडे यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना बीड आणि परळीतील घटनांबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी थेट विधान केले. ङ्या घटना सर्वच ठिकाणी घडत आहेत. परळी परळी करु नका. तुमचा फोकस परळीकडे आहे. यात जे कोणी गुन्हेगार आहेत त्यांना थेट फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.कुठेही अशाप्रकारची घटना घडणं चूकया घटना होऊ नयेत. ही एक प्रवृत्ती आहे. परळी परळी करु नका. प्रत्येक ठिकाणी घटना घडत आहेत. तुमचा फोकस परळीकडे आहे. घटना सर्व ठिकाणी घडत आहेत. माझ्याकडे माहिती आलेली आहे. कोणत्या मतदारसंघात कोणत्या जिल्ह्यात काय घडत आहे, याची संपूर्ण माहिती आहे. कुठेही अशाप्रकारची घटना घडणं चूक आहे. या घटना घडणं चुकीच्या आहेत. यात जे कोणी गुन्हेगार आहेत, त्यांना थेट फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. त्यांना पकडायला हवं, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

### आपण हा प्रश्न मार्गी लावू

या जिल्ह्यात अनेक उद्योग येण्यास इच्छुक आहेत, असे अजित दादांनी सांगितलं. पण एखाद्या घटनेमुळे किंवा दुर्देवी प्रसंगामुळे आपल्या जिल्ह्याची प्रतिमा डागळायला नको. ते उद्योग दूर जायला नको. मी पालकमंत्री असल्यापासून इथे विमानतळ व्हावं यासाठी मीदेखील प्रयत्न करत होते. पण जेव्हा शासनाने शासकीय जागा हवी असा निर्णय घेतला आणि तेवढी शासकीय जागा एकाच ठिकाणी मिळणं हा प्रश्न होता. तो प्रश्न कसा सोडवायचा असे अजित दादांना विचारले. त्यावर त्यांनी आपण हा प्रश्न मार्गी लावू असे सांगितले, असेही पंकजा मुंडेंनी यावेळी म्हटले.




### माझ्या स्वागतासाठी जेसीबी लावू नका

यानंतर पंकजा मुंडेंनी सर्व कार्यकर्त्यांना एक विनम्र आवाहन केले. माझ्या स्वागतासाठी जेसीबी लावू नका. गुलाबाचं फूल देऊन स्वागत करा. फटाकेही फोडू नका, फटाक्यांमुळे पर्यावरणाचा -हास होतो, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३१ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### कौन बनेगा दिल्लीपती?

देशभरातील लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील श्रीसिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ड्रेसकोड लागू करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. मंदिर प्रशासनाने एक पत्रक काढून तसे जाहीर केले आहे. मुंबईच्या मध्यवर्ती भागात दादर प्रभादेवी येथे वसलेल्या पुरातन श्रीसिद्धिविनायक मंदिरात फार पूर्वीपासून भक्तांची गर्दी पाहायला मिळते. प्रतिदिन हजारो भक्तगण श्रीगणरायाच्या चरणी लिन होण्यासाठी येतात. मंगळवारी आणि संकष्टी चतुर्थीच्या दिवशी हा आकडा काही लाखांच्या घरात जातो. आपल्या आराध्य देवतेच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देश आणि विदेशातील भाविकही याठिकाणी येत असतात. मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी सात्विकता जपली जावी यासाठी मंदिर प्रशासनाने नुकतेच एक पत्रक काढले असून मंदिरात येणाऱ्या भाविकांनी इतरांना संकोच वाटणार नाही यासाठी आपल्या संस्कृतीला साजेसे म्हणजे अंगभर कपडे परिधान करून यावे असे आवाहन या पत्रकातून केले आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यास मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही असेही या पत्रकात नमूद केले आहे. आजमितीला राज्यातील अनेक मंदिर प्रशासनांनी आपापल्या मंदिरांत भाविकांसाठी ड्रेसकोड अर्थात वस्त्रसंहिता लागू केली आहे. भारतीय संस्कृतीची भुरळ आज साऱ्या जगाला आहे. त्यामुळेच प्रयागराज येथील महाकुंभातील सात्विकता अनुभवण्यासाठी आणि परमपवित्र गंगा नदीत डुबकी मारण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक, सेलिब्रिटी कुंभनगरीत आले आहेत. प्राचीन हिंदू संस्कृती आणि मंदिरे देशाचा अनमोल ठेवा आहेत. आजवर या देशावर अनेक आक्रमकांनी हल्ले करून येथील वैभव लुटून नेले मात्र येथील संस्कृतीच्या खुणा त्यांना मिटवता आल्या नाही. या खुणा आणि त्यांचे पावित्र्य जतन करून ठेवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे ते पावित्र्य टिकवून ठेवण्याचे दायित्व आता आपल्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात जेव्हा मंदिरांतून वस्त्रसंहिता लागू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा समाजातून जसे या भूमिकेचे स्वागत झाले तसा यास काही पुरोगामी मंडळींकडून विरोधही करण्यात आला. तरीही मागील दोन वर्षांत राज्यातील अनेक मंदिरांनी ड्रेसकोड लागू केले आहेत. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात राज्यातील काही उत्सव मंडळांनीही श्रीच्या मंडपात वस्त्रसंहितेचे पालन करणे बंधनकारक केले. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांत मागील शेकडो वर्षांपासून वस्त्रसंहिता लागू करण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी महाराष्ट्रातून जाणारे भाविक त्याचे तंतोतंत पालन करतात, मग राज्यातील वस्त्रसंहितेला विरोध का ? मंदिरांच्या गाभाऱ्यात जाताना पुरुषांनी सोवळे आणि स्त्रियांनी साडी नेसावी ही प्रथा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे, हे आपणा सर्वांना ज्ञात आहे, मग मंदिर परिसरातील वस्त्रसंहितेला आक्षेप नेमका कशासाठी ? मुळात मंदिरे ही काही सहलीची ठिकाणे नाहीत कि ज्या ठिकाणी कोणी मौज मजेसाठी यावे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येकाला त्या देवतेचे दर्शन घ्यायचे असते, देवतेच्या मूर्तितून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करायचे असते, आपले मागणे देवापुढे मांडायचे असते याचाच अर्थ तिथे देव प्रत्यक्ष आहे आणि तो आपले म्हणणे ऐकणार आहे अशी श्रद्धा येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात असते मग त्या देवतेच्या ठिकाणचे पावित्र्य जपणे आपले कर्तव्य नव्हे का ? मुलांना शाळेत पाठवताना आपण शाळांनी ठरवून दिलेला गणवेश घालून त्यांना पाठवतो, कार्पोरेट कार्यालयांतही कपड्यांच्या बाबतीत कंपनीने घालून दिलेले नियम कर्मचाऱ्यांना पाळावे लागतात. रुग्णालये, न्यायालये, पोलीस, टपाल कार्यालय सर्वच ठिकाणी ड्रेसकोड आहेत आणि वर्षोनुवर्षे या ड्रेसकोडचे पालन होत आलेले आहे, मग देवालयांत जाताना आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा कशी बरे येते ? कोरोना काळात कोरोना रुग्णांना भेटायला जाताना पीपीई किट परिधान करून जाणे बंधनकारक करण्यात आले होते त्यावेळी ते नियम डॉक्टरांनी केले होते म्हणून आपण सर्वांनीच ते पाळले. मग धार्मिक स्थळांच्या बाबतीत धर्म आणि अध्यात्मशास्त्र जाणणाऱ्या मंडळींनी केलेले नियम आपल्याला मान्य का होत नाहीत ? चित्रपटात अंग प्रदर्शन करणाऱ्या हॉलिवूड- बॉलिवूडमधील नायिकाही मंदिरांत जाताना साजेशी वस्त्र परिधान करतात, डोक्यावर पदर घेतात मग आपण या नियमांना विरोध करून नेमके कोणते पुढारलेपण दाखवत आहोत ? पुरातन मंदिरे ज्यावेळी निर्माण करण्यात आली त्यावेळी सामान्य लोकांचे पोशाख हे सात्विक आणि धर्माला अनुसरून होते त्यामुळे त्यावेळी वस्त्रसंहिता बनवण्याची गरजच निर्माण झालेली नव्हती. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा पगडा, धार्मिक स्थळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला गेल्याने वस्त्रसंहिता लागू करणे आज अनिवार्य झाले आहे. मंदिरे ही पर्यटनाची केंद्रे नसून ती धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी योग्य ती शुचिर्भूतता पाळली जावी, मंदिरांचे पावित्र्य राखले जावे, मंदिरांत येणाऱ्या भाविकांचा देवतेप्रतीचा भाव टिकून राहावा यासाठी तोकडे आणि निषिद्ध कपडे परिधान करून मंदिरांत प्रवेश करण्यास अनेक देवस्थानांकडूकोणाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवावा आणि कोणाच्या नाही अशी मतदारांची दोलायमान स्थिती झाली आहे. मतदार जाणून आहेत की, आपल्या मूलभूत समस्यांवर कोणत्याही राजकीय पक्षाकडे उपाय नाही. म्हणूनच त्याला पैशाचे आमिष दाखवले जात आहे. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयालक्ष्मी पंडित म्हणाल्या होत्या की, निवडणुकीतील आश्वासने फक्त निवडणुकीतच राहतात!

## अजितदादा बीडची बारामती करा;शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी ज्ञानमंदिरांना भरीव निधी द्या ; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.३० ) अजितदादा बीडची बारामती करा, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी ज्ञानमंदिरांना निधी द्या.बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत तर ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे तसेच जिल्हा परिषदेच्या

ईमारत नसलेल्या ६३ वस्तिशाळांना ईमारत निधी, १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे.तसेच जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये

स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत आहे त्याम ुळे दुरावस्थेत असलेल्या

जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यात भरीव निधी देण्यात यावा यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि.३० गुरुवार रोजी धरणे आंदोलन करण्यात येऊन ना.अजितजी पवार,ना. धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे , आ. प्रकाशदादा सोळंके,आ.सुरेश धस,आ. विजयसिंह पंडित,आ.संदिप क्षीरसागर, आ.नमिता मुंदडा, यांना निवेदन देण्यात आले आहे. आंदोलनात शेख युनुस,रामनाथ खोड, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक,पांडुरंग हराळे,बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप माजी सैनिक अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना नितीन सोनवणे, शहराध्यक्ष राजेश वडमारे आदी सहभागी होते.

अ )मागणी क्रमांक १
मोडकळीस आलेल्या शाळांच्या पुनर्बांधणी व




शाळा खोल्यांच्या दुरूस्तीसाठी निधी द्यावा

----

बीड जिल्ह्यामध्ये शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक सादिल -२०२१/ प्र.क्र.१०१/एसएम -४, मंत्रालय मुंबई दि.०९.०९.२०२१ नुसार राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत मराठवाड्यातील निजाम कालीन जुन्या व मोडकळीस आलेल्या शाळांच्या वर्गखोल्या दुरूस्ती व पुनर्बांधणीकरीता बीड जिल्ह्यामध्ये २१७ शाळांमधील ३५२ वर्गखोल्या बांधकामासाठी रूपये ३२९१.२० लक्ष व १७२ शाळांमधील वर्गखोल्या दुरूस्तीसाठी ४०४.१५०लक्ष असे एकुण ३६९५.३५ लक्ष निधी मंजूर झालेला असुन वरील नमूद शासन निर्णयानुसार सदरील मंजूर रकमेपैकी ८० रक्कम शासन स्तरावरून प्राप्त होणार असुन १०टक्के रक्कम संबंधित जिल्हापरीषदेने त्यांच्या शेष फंडातून/१५ वा वित्त आयोग/जिल्हा नियोजन समिती/आमदार निधी/खासदार निधी/मानव विकास मिशन इत्यादी पैकी तरतुदीतुन व उर्वरीत १० टक्के निधी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक लोक वर्गणीतून किंवा सी.एस.आर.(उडठ र्षीपव ) रोख किंवा वस्तू स्वरूपात उपलब्ध करून द्यायचा आहे.उपरोक्त मंजूर निधी पैकी शासन स्तरावरून प्राप्त होणा-या ८०% निधी पैकी रूपये १६९९.८६ लक्ष निधी मार्च २०२२ मध्ये प्राप्त झालेला आहे.

शिक्षण आयुक्त पुणे व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी घेतलेल्या आढावा बैठकीतील सुचनेनुसार १५ लक्ष पर्यंतची कामे ग्रामपंचायत मार्फत व १५ लक्ष रकमेपेक्षा जास्त रकमेची कामे इ निवेदने द्वारे करण्याबाबत माहे आगस्ट २०२२ मध्ये निर्णय घेण्यात आला.त्यानुसार पहिल्या टप्प्यात १५ लक्ष पेक्षा कमी रकमेच्या असलेल्या ग्रामपंचायत मार्फत करावयाच्या ११२ शाळांमधील ११२ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी रूपये १०३०.४० लक्ष व १४२ शाळांमधील वर्गखोल्या दुरूस्तीसाठी रूपये ३३५.७० लक्ष च्या कामास दि.१८.०९.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत.व सदरील कामे प्रगतीपथावर आहेत.तसेच १५ लाखांपेक्षा जास्त रकमेच्या ८५ शाळांमधील २०९ वर्ग खोली बांधकामाच्या रुपये १९५८.००लक्ष कामास माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रशासकीय मंजुरी देऊन सदरील कामाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत.

तसेच जिल्हा नियोजन समिती मधुन सन २०२२-२३ मध्ये ७६ प्राथमिक शाळांमध्ये ८९ वर्गखोली बांधकामासाठी ८८९ लक्ष व १५६ शाळांमधील दुरूस्ती साठी ६७२.२७ लक्ष व माध्यमिक ४ शाळांच्या दुरूस्ती साठी ६५ लक्ष व २१ शाळांमधील वर्गखोल्या बांधकामासाठी २१३ लक्ष असे एकुण १८३९.२७ च्या कामांसाठी माहे मार्च २०२३ मध्ये प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.सदरील कामे लवकरात लवकर सुरू करण्यात येतील .या व्यतिरिक्त आवश्यक असणा-या शाळांमधील वर्गखोल्या बांधकामासाठी व दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समिती, महाराष्ट्र शिक्षण परीषद मुंबई यांच्याकडे सन २०२३-२४ मधील आराखड्यामध्ये मागणी करण्यात आलेली आहे.

आ) मागणी क्रमांक २
जिल्हा परिषदेच्या ६३ वस्तिशाळांना स्वतःची इमारत नाही त्यासाठी निधी द्यावा

----

बीड जिल्ह्यातील एकुण ९८ वस्तिशाळांना स्वतःची ईमारत नसल्याने गेल्या १३ वर्षांपासून झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये अथवा किरायाच्या घरात भरविण्यात येत असुन गेल्या २ वर्षात ३५ वस्तिशाळांच्या इमारतीसाठी निधी मंजूर झाला असुन उर्वरित ६३ वस्तिशाळांच्या इमारतीसाठी निधी देण्यात यावा.

इ) मागणी क्रमांक ३
जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असुन त्यासाठी निधी द्यावा

---

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१६४ शाळांपैकी ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असुन विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असुन त्यासाठी निधी देण्यात यावा.

ई) मागणी क्रमांक ४
जिल्हा परिषदेच्या २४८० शाळांपैकी १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असुन डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन निधी द्यावा

---बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४८० शाळांपैकी ७७२ शाळांना वीज पुरवठाच करण्यात आलेला नाही तर ६२० शाळांमधील वीजपुरवठा महावितरण कर्मचा-यांनी वीज देयके थकीत असल्याने वीज पुरवठा खंडित करून मीटर काढून नेले आहे.तब्बल १३९२ शाळांमधील विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर ,स्मार्ट टीव्ही ,डिजिटल बोर्ड ,एलईडी आदी उपकरणे व साहित्य धुळखात पडुन असून एकंदरीतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यच अंधारात आहे. त्यामुळे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन वीज देयके व इतर कारणांसाठी निधीची तरतूद करण्यात यावी.

. कुष्ठरोगाच्या निर्मूलनासाठी शासन स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातात . निधीही खर्च केला जातो , त्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे , म्हणून हा लेखनप्रपंच !

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत धनंजय मुंडेंनी मांडला ५ वर्षांचा हिशोब

बीड। प्रतिनिधी बीड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षातील त्यांच्या चार वर्षाच्या पालकमंत्री कार्यकाळातील कामकाजाचा लेखाजोखा आज उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर बैठकीदरम्यान मांडला. मागच्या पाच पैकी चार वर्षे मी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. त्यात साधारण दोन ते अडीच वर्षे ही कोविड मध्ये गेली. त्या काळात रुग्णांना तातडीचे योग्य उपचार मिळवून देणे तसेच लोकांचे प्राण वाचवणे आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करणे ही कामे प्राधान्याने करत कोविडच्या काळामध्ये जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करण्यात आले. अनेक कोविड सेंटर विविध वैद्यकीय साहित्य त्याचप्रमाणे रुग्णवाहिका अशा आरोग्य यंत्रणांना बळकटी देणाऱ्या बाबींवरती मोठ्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीचा निधी त्याकाळी खर्च केला गेला, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात दिली. बीड जिल्ह्यात राबविलेला पिक विमा पॅटर्न, विमा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कंपनीच्या विरोधात फौजदारी खटला दाखल करणे, विविध नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देणे, अशी अनेक कामे केली. २०२४ सालचे अतिवृष्टी अनुदान मंजूर होऊन आलेले आहे, त्याचे वितरण लवकर पूर्ण केले जावे असेही धनंजय मुंडे म्हणाले. याच काळात जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुमारे ११०० किमी रस्त्यांच्या विकासाचे काम पूर्ण झाले. पंकजाताई मुंडे यांच्या पालकमंत्री कार्यकाळात मंजूर होऊन सुरू झालेले जिल्हा परिषद इमारत बांधकाम पूर्णत्वास गेले. पंकजाताई मुंडे यांचे पाच वर्ष व त्यापुढे मला मिळालेला ४ वर्षांचा कालावधी यात, आम्ही सर्वसमावेशक विकास साधण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. जिल्हाधिकारी कार्यालय बांधकाम सुरू आहे. मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू आहे. परळी ते बीड या महत्त्वाच्या रस्ता रुंदीकरणचे काम सुरू आहे. यांसह जिल्ह्यात न्यायलये, प्रशासकीय इमारती, विश्रामगृह, शासकीय रुग्णालयांच्या दर्जा उन्नती व बांधकाम असे अनेक महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांची कामे या काळात केली गेली तर अनेक कामे सध्या प्रगतीपथावर आहेत, कृषी भवन, महिला व बालविकास भवन, सीताफळ इस्टेट अशी अनेक मंजूर असलेली कामे आता दादांच्या नेतृत्वात पूर्णत्वास जातील, अशी अपेक्षा धनंजय मुंडेंनी व्यक्त केली. बीड जिल्हा कुणबी प्रमाणपत्र देण्यात महाराष्ट्रात सर्वात आघाडीवर आहे, हेही धनंजय मुंडे यांनी नमूद केले. बीड जिल्हा पोलिस दलास आवश्यक ७३ नवीन वाहने, ११३ मोटार सायकल या बाबी नियोजन समितीच्या माध्यमातून देण्यात आल्या. अशी अनेक सकारात्मक कामे करताना सर्व तालुक्यांना समान निधी देण्याचीही पुरेपूर काळजी घेण्यात आली, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी ऐकीव आणि अर्धवट माहितीच्या आधारे नियोजन समितीच्या कामकाजावर मागील काही दिवसात करण्यात आलेल्या निराधार आरोपांना देखील धनंजय मुंडे यांनी चोख प्रत्युत्तर दिल

## नांदेड जिल्हयाच्या ७०३ कोटीच्या प्रारुप आराखड्यास मंजूरी

### पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची बैठक

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : जिल्ह्याच्या सन २०२५-२६ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या ७०३ कोटीच्या प्रारूप आराखडयास जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिली. इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली.

नांदेड जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. बैठकीला राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, खासदार डॉ. अजित गोपछेडे, खासदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार भीमराव केराम, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापुरकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर,आमदार आनंद पाटील बोंढारकर, आमदार श्रीजया चव्हाण, प्रधान सचिव तथा नांदेड जिल्ह्याच्या पालक सचिव श्रीमती राधिका रस्तोगी, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्रीमती कावेली मेघना,अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे,आदींची उपस्थिती होती.

नांदेड जिल्ह्याच्या २०२५-२६ च्या ७०३ कोटींच्या मर्यादेतील आराखड्यात भरीव वाढ करण्याची शिफारस राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले. सोबतच सन २०२४-२५ च्या ७४९ कोटी मंजूर आराखड्यातील १०० टक्के खर्च करण्याचे निर्देश त्यांनी येथे दिले.

शासनाने ७०३ कोटीची आर्थिक मर्यादा घालून दिली आहे. तर विविध विभागाने १७७२ कोटीची मागणी केली आहे. मंत्रालय स्तरावर वित्त व नियोजन मंत्र्यांच्या मार्गदर्शनात राज्यस्तरीय बैठक होईल. त्यामध्ये शासनाने घातलेली मर्यादा व प्रत्यक्ष मागणी यावरून जिल्ह्याचा २०२५-२६ चा नियोजनाचा आराखडा ठरणार आहे. या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील यंत्रणेने प्रस्तावित केलेल्या



मागणीप्रमाणे निधी मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

अर्थ विभागाने सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपायोजना, आदिवासी उपाययोजना, या तीनही घटकांना मिळून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ७०३ कोटींची आर्थिक मर्यादा निर्धारित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील यंत्रणेने मात्र जवळपास १७७२ कोटीची मागणी केली आहे. वित्त व नियोजन मंत्र्यांच्या बैठकीमध्ये आता जिल्ह्याच्या डीपीडीसीच्या अंतिम प्रारूपाला मान्यता मिळणार आहे. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण साठी शासनाने ४७७ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १६४ कोटी आदिवासी उपयोजनेसाठी ६१ कोटी रुपये आर्थिक मर्यादा केली आहे. तर यावर्षी मार्च अखेरपर्यंत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण मधून ५२५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेमधून १६४ कोटी, आदिवासी उपयोजनेतून ५९ कोटी, जिल्ह्यातील सर्व शाखांना खर्च करायचे आहे. हा खर्च पुढील दोन महिन्यात करायचा असून जिल्हा यंत्रणेपुढे तीनही योजनेतील ७४९ कोटी खर्च करणे आवश्यक आहे. आतापर्यंत वितरित २१६ कोटींपैकी १७७ कोटी खर्च झालेला आहे. वितरित झालेल्या तरतुदीसी खर्चाची ८२ टक्केवारी आहे. मात्र, दोन महिन्यात उर्वरित खर्च यंत्रणांना पूर्ण करायचा आहे.

तत्पूर्वी, पालकमंत्री महोदयांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक गावात स्मशान भूमी देण्यात यावी,आदिवासींची संख्या लक्षात घेता या योजनेमध्ये अधिक निधीची तरतूद करण्यात यावी, स्मशानभूमी सभोवतालचे अतिक्रमण काढण्यात यावे, पाणंद रस्ते मोकळे करण्यात यावे, वनजमिनीचे पट्टे परंपरागत शेती करणा-यांना देण्यात यावे, आदी विषयांवर लोकप्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला. यासोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत व जिल्ह्यातील अंमलबजावणी बाबत यावेळी अधिका-यांसोबत उपस्थित खासदार आमदारांनी चर्चा केली.

नांदेड येथील स्व. डॉक्टर शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व तेथील सोयी सोयी सुविधा. सिटीस्कॅन बंद असणे, गोदावरी नदीचे शुद्धीकरण, जलजीवन मिशनची प्रलंबित कामे,याबाबतही चर्चा झाली.जात पडताळणी व तत्सम प्रमाणपत्र तातडीने मिळण्यासाठी आणखी सक्रियतेने समाज कल्याण विभागाच्या अधिका-यांनी काम करावे, याबाबतही यावेळी पालकमंत्र्यांनी निर्देशित केले.

बैठकीमध्ये सुधारीत रेती धोरण, महावितरण मार्फत शेतक-यांना विनाविलंब ट्रांसफार्मर मिळण्याबाबत,तसेच अंगणवाडी सेविका सेवा नियुक्ती प्रक्रियेत नियमांचे पालन करणे,या मुद्यांवर विस्तृत चर्चा झाली. बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.तर सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांनी केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ३१ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# आरटीई प्रवेशासाठी २ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

बीड-प्रतिनिधी आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील गोरगरीब पाल्यांना श्रीमंताच्या बरोबरीने खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेला जिल्ह्यात पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात २ हजार २३५ जागांकरीता होत असलेल्या प्रवेशासाठी सोमवार २७ जानेवारी शेवटची तारीख होती. त्यामुळे पालकांनी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार शिक्षण विभागाकडून याला मुदतवाढ दिली आहे. आता २ फेब्रुवारी पर्यंत पालकांना आपल्या पाल्यांचे प्रवेश - अर्ज करता येणार आहेत त्यामुळे जास्तीत जास्त पालकांनी अर्ज करावेत असे आवाहन शिवसंग्राम युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे. आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ मिळाल्याने पालकांना दिलासा मिळाला आहे. सोमवार सायंकाळ सात वाजेपर्यंत ४ हजार २८१ प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यात आरटीई प्रक्रियेला १६ डिसेंबरपासून सुरुवात करण्यात आली - यामध्ये ४ जानेवारीपर्यंत पहील्या टप्प्यात शाळा नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात आली. यादरम्यान जिल्ह्यातील पात्र २१४ शाळांची नोंदणी करण्यात आली आहे. नोंदणी झालेल्या शाळांच्या पटसंख्येच्या २५ टक्केच्या प्रमाणात २ हजार २३५ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. या जागांवर आता निःशुल्क आरटीई प्रवेश स्वीकारले जाणार आहेत. या दरम्यान १४ जानेवारीपासून ऑनलाईन अर्ज करण्याला सुरूवात करण्यात आली. सोमवार २७ जानेवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत जिल्ह्यात ४ हजार २८१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अर्ज करण्याची धुम जिल्ह्यात दिसून येत आहे. आता २ फेब्रुवारी पर्यंत अर्ज करता येणार आहेत

# ॲड.मुमताज नजीर खान यांची भारत केंद्र सरकार नोटरी पदी निवड



मुंबई ।प्रतिनिधी बांद्रा न्यायालय येथील ज्येष्ठ विधितज्ञ ॲड. मुमताज नजीर खान यांचे एलएलबी एल एल एम या पदव्या घेऊन बांद्रा जिल्हा न्यायालयात गेल्या अनेक वर्षापासून दिवाणी व फौजदारी अंतर्गत न्यायालयात काम करत आहे. तसेच ॲड. मुमताज नजीर खान यांना भारत केंद्र सरकार नोटरी पदी निवड करण्यात आली आहे. त्यांना ऑनलाइन द्वारे नोटरी अधिकारी पदी निवड झाल्याचे प्रमाणपत्र देखील मिळाले आहे. केंद्र सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे. ही यादी दिनांक २८/१/ २०२५ रोजी जाहीर करण्यात आली असून याचा रजि. नं.३५८४० हा आहे. ॲड. मुमताज नजीर खान यांना मुंबई येथील सर्व उपनगरांमधील न्यायालयात नोटरी करण्याचा अधिकार दिला आसून त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे बांद्रा न्यायालय कोर्ट वकील संघाच्या वतीने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या आहे. तसेच नातेवाईक व विविध क्षेत्रातील मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या

# व. प्रा. संतोषजी महादेवराव काळे

## यांच्यापुण्यतिथीनिमित्त १०० स्कूल बॅग वाटप

बीड : तालुक्यातील आहेर चिंचोली येथे २६ जानेवारी रोजी श्री नारायण मा. व उच्च मा. विद्यालयामध्ये स्व. प्रा. संतोषजी महादेवराव काळे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणार्थ विद्यार्थ्यांना १०० स्कूल बॅग वाटप व विविध स्पर्धा घेऊन बक्षीस वितरण करण्यात आले. चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले . मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे मा. प्रा. दीपकराव लाटे सर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, प्राचार्य तथा संस्थेचे सचिव अमोल काळे सर, माजी प्राचार्य विनायक ढास सर, सौ. राजश्री काळे/ पिंगळे मॅडम, यावेळी अनेक मान्यवर ,ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. या दहावीच्या दोन विद्यार्थिनींना आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. कु. प्रतीक्षा तुकाराम काळे, कु. दिशा धनंजय चर्हाटकर यांना स्व. कय्युम शेख व स्व. नसीम शेख यांच्या स्मरणार्थ पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चव्हाण सर यांनी केले तर सूत्रसंचालन रकटे बी.आर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक अशोक घरत सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. मस्के जी.बी , श्री शेख सर,श्री इनकर बी .जे, श्री करपे सर, प्रा. पौळ डी.बी, सौ.भुतावळे मॅडम, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी, कदम एस .व्ही, प्रा. मस्के मॅडम, प्रा.मुरमुडे ए .एन , रकटे बी. आर , प्रा.प्रवीण रकटे यावेळी शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# यांनी केलं तर प्रेम आणि आम्ही केला तर बलात्कार; राज ठाकरेंचा राजकीय पक्षांच्या बदलत्या भूमिकांवर जोरदार प्रहार

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांन पक्षाच्या मेळाव्यात पुन्हा तुफान फटकेबाजी केली. सध्याच्या राजकारणावर त्यांनी अचूक निशाणा साधला. त्यांनी राजकीय पक्षांच्या बदलत्या भूमिकांवर जोरदार प्रहार केला. मनसेच्या भूमिकेवर कायम प्रश्नचिन्ह लावणा-यांची त्यांनी चांगलीच हजेरी घेतली. त्यांच्या सूचक वक्तव्यांमुळे आगामी निवडणुकीत मनसेच्या वाटचालीवर त्यांनी प्रकाश टाकला. यांनी केलं तर प्रेम आणि आम्हीः शिवसेनेच्या बदलत्या राजकारणावर त्यांनी वरळी येथील मेळाव्यात प्रकाश टाकला. शिवसेनेचा जन्म झाला. १९६६मध्ये त्यांनी पहिली निवडणूक प्रजा समाजवादी सोबत लढवली. त्यानंतर मुस्लिम लीग सोबत युतीही केली होती. त्यानंतर काँग्रेसला पाठिंबा दिला. ८० मध्ये काँग्रेसही युतीही केली. नंतर भाजपसोबत गेले. त्या त्यावेळी जी परिस्थिती असते त्यानुसार पक्ष निर्णय घेतात. पण त्यांची ती बदलली ती परिस्थिती. यांचं सालं एक बरं आहे. त्यांनी केलं तर प्रेम आणि आम्ही केला तर बलात्कार, असा जोरदार पलटवार त्यांनी टीकाकारांवर केला. धनंजय मुंडेंकडून अजित पवारांचे स्वागत, इकडे लाडक्या बहिणीची मोठी मागणी, बीड दौंयात दादा निर्णय घेतील? चांगले त्याला चांगले म्हटले लोकसभेत मोदींना आपण का पाठिंबा दिला याविषयी त्यांनी भूमिका स्पष्ट केली. लोकसभेत मोदी शिवतीर्थावर आले होते. त्यावेळी त्यांच्यासमोर मी म्हटलं मला ज्या ज्यावेळी बोलायचं ते बोललो. मी असं काही म्हटलं का की मी बोललो नाही. मी म्हणालोच नाही. माझं बोलून झालं. माझं सुटलं ते सुटलं. जे बोललो त्याला आधार होता. जे चांगलं कराल त्याला चांगलं म्हणू. जे वाईट त्याला वाईट म्हणू, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली. विरोधकांवर साधला निशाणा यावेळी त्यांनी विरोधकांचा आणि टीकाकारांचा खरपूस समाचार घेतला. अनेकांना वाटतं राज ठाकरेंनी भाजपच्या नेत्यांना भेटलं नाही पाहिजे. भेटलं नाही पाहिजे? सम रेच्याने सांगितलं चहा प्यायला ये तर काय सांगू घरीच पी. तुम्ही काय वेगळं सांगाल? मला ते भेटायला येतात तेव्हा मी तुम्हाला विकत नाही. माझा मराठीचा बाणाही बोथट करत नाही. येतात, फोन करतात, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली. पराभवाने खचलो नाही, विजयाने हुरळून गेलो नाही लहानपणापासून अनेक पराभव आणि विजय पाहिले. पराभवाने खचलो नाही आणि विजयाने हुरळून गेलो नाही. खचलेल्या पिचलेल्या लोकांचं मला नेतृत्व करायचं नाही. माझ्याबरोबर राहायचं असेल तर ठाम राहा. जे महाराष्ट्रासाठी करायचं, मराठी माणसासाठी करायचं आहे, हिंदुसाठी करायचं ते करणारच आहोत. आज नाही, उद्या, उद्या नाही परवा. पण होणारच आहेत, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# किनवट तालुका पत्रकार संघटनेने घेतली नाईक कुटुंबाची सांत्वनपर भेट

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : किनवट माहूर विधानसभेचे माजी आमदार दिवंगत प्रदीप नाईक यांच्या दुःखद निधनाबद्दल किनवट तालुका पत्रकार संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी दि.२८- जानेवारी रोजी दहेलीतांडा येथे नाईक कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.जनतेप्रमाणेच पत्रकारांचेही अतोनात प्रेम आणि सहकार्य प्रदीप नाईक यांना लाभले आहे.यापुढेही पत्रकार बांधवांचे असेच सहकार्य लाभावे अशा अपेक्षा बेबीताई प्रदीप नाईक यांनी व्यक्त केल्या. किनवट माहूर विधानसभेचे माजी आमदार



प्रदीप हेमसिंग जाधव नाईक यांचे १-जानेवारी रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले त्यांच्या निधनामुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली असून नेतेमंडळी व विविध क्षेत्रातील मान्यवर दहेलीतांडा येथे भेट देत आहेत.राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह प्रमुख नेत्यांनी सांत्वनपर भेटी दिल्या दरम्यान २८-जानेवारी रोजी किनवट तालुक्यातील पत्रकार संघटनेचे पदाधिकारी व पत्रकार सदस्यांनी दहेली तांडा येथे नाईक कुटुंबीयांची भेट घेतली.पत्रकारांशी संवाद साधताना बेबीताई नाईक अत्यंत भावुक झाल्या.प्रदीप नाईक आणि पत्रकारांच्या आठवणी सांगताना त्यांचा कंठ दाटून आले. एक सर्वसमावेशक नेता म्हणून माझ्या पतीला पत्रकारांनी मोलाचे सहकार्य केले पत्रकारांच्या सकारात्मक बातम्यामुळे आम्हाला जनसेवा करण्याचे बळ मिळाले. पत्रकारांचे हे प्रेम आणि सहकार्य आमच्या कायम स्मरणात राहील. नाईक साहेब गेले म्हणुन आम्हाला परकं करू नका हा जिव्हाळा, प्रेम असच कायम असुद्या अशा भावना बेबीताई नाईक यांनी व्यक्त केल्या.यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष फुलाजी गरड पाटील ज्येष्ठ पत्रकार के.मूर्ती, ॲड.मिलीद सर्प,गोकुळ भवरे,पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पोहरकर, दुर्गादास राठोड ,अनिल भंडारे,किरण ठाकरे, मलिक चव्हाण, वसंत राठोड उपस्थित होते.

# कंत्राटी शिक्षकांची विद्यावेतन देण्यात यावी नसता तीव्र आंदोलन

माजलगाव-प्रतिनिधी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थी सहा महिन्याकरिता प्रशिक्षण घेत आहेत. अशा कंत्राटी शिक्षक बहुतांशी जिल्ह्यातील प्रत्येक प्रशिक्षणार्थी हा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) म्हणून तन मनाने विद्यादानाचे काम करत आहे. आज या कार्य प्रशिक्षण प्रणालीला पाचवा महिना लागला आहे. आपला कार्यकाळ सहा महिन्याचा असल्याने ते प्रशिक्षणार्थी हवालदिलं झाले आहेत. प्रशिक्षणार्थ्यांनी पाच महिन्याच्या प्रशिक्षण काळात जे विद्यादानाचे काम केले आहे त्याचा मोबदला पण त्यांना आजतागायत देण्यात आला नाही तालुकास्तरावरील संबंधित अधिकाऱ्याची मानधनाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून जिल्हा कौशल्य विभागातील



कर्मचाऱ्याकडून आपल्या ऑनलाईन मध्ये डिफॉल्ट असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रत्येक वेळी आपली ऑनलाइन प्रणाली चुकीची असल्याचे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. असे बोलले जात आहे कित्येकदा जिल्हा कौशल्य विभागाकडून ऑनलाईन झालेले फाईल त्या डिलीट करण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी संबंधित विभागास योग्य त्या सूचना करून मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन देऊन तात्काळ निर्णय घ्यावा नसता दिनांक ३१ जानेवारी रोजी संबंधित कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांच्या मार्फत देण्यात आला या निवेदनावर शरद पवार, दिगंबर बादाडे, अविनाश क्षिरसागर, छाया शिंगाडे, पूजा शिंदे , अश्विनी फुंदे , विशाखा वक्ते , सम्रता पोटभरे , परमेश्वर नरसाळे, अमोल चव्हाण, श्रुती कदम, गोविंद आव्हाड, विजय पवार, अजय डाके, शेख आयशा, लक्ष्मण पवार , अंगद गरड, महादेव गरड, साळवे सुकेशनी आदीसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# महात्मा फुले स्मारकाच्या विस्तारासाठी प्रशासकीय मान्यता

**मुंबई-प्रतिनिधी पुणे येथील महात्मा जोतिबा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन आणि रहिवाशांचे अन्यत्र पुनर्वसन करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी प्रशासकीय मान्यता दिली. या कामांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून प्रशासकीय मान्यता मिळाल्याने आता या स्मारकाच्या विस्तारीकरणाला अधिक गती मिळणार आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आ. छगनराव भुजबळ साहेब यांच्या अनेक वर्षाच्या मागणीला आणि प्रयत्नांना यश मिळाल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजित पवार व माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांचे अ.भा. महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी आभार व्यक्त केले आहेत**

# माजलगावच्या भावी आमदार म्हणून मिरवणाऱ्या जयसिंग सोळंकेंची गाडी पोलिसानी अडवली



बीड । भावी आमदार समजणारे जयसिंग सोळंके हे पालकमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यात होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात जाताना सामाजिक न्याय भवनच्या गेटवर पोलिसांनी गाडी अडवून बाजूला घेण्यास भाग पाडले. यानंतर मग त्यांनी ओळख सांगितली आणि पोलिसांनी प्रवेश दिला. पण यामुळे जयसिंग सोळंके यांना काम करुन ओळख निर्माण करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे आज बीडच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी ते सकाळीच बीड येथे हेलिकॉप्टरने दाखल झाले. यावेळी त्यांच्या स्वागतासाठी शेकडो कार्यकर्त्यांनी हेलिपॅड पोलीस ग्राउंडवर मोठी गर्दी केली होती. येथून ताफा सरळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने निघाला या ताफ्यात अनेक वाहने होती. सामाजिक न्याय भवनच्या गेटमधून वाहने जिल्हाधिकारी कार्यालयात जाणार होती. यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते भावी आमदार समजणारे जयसिंग सोळंके यांचे वाहन पोलिसांनी अडवून बाजूला घेण्यास भाग पाडले. यानंतर त्यांनी पोलिसांना ओळख सांगितली अन् नंतर त्यांना आत जाण्याची परवानगी दिली. पण जिल्हापरिषद मध्ये सदस्य, सभापती म्हणून त्यांना जनतेची कामे करुन छाप पाडता न आल्याने त्यांची ओळख निर्माण झालेली नाही. त्यांनी आमदारकीचे स्वप्न पहाण्याआधी सर्वसामान्य लोकांची सेवा करुन ओळख निर्माण करण्याची गरज असून, सोळंके यातून बाहेर पडून काम करुन ओळख निर्माण करण्याची गरज असल्याची येथे चर्चा सुरू झाली आहे.

# शेकापच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पालकमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन :- भाई विष्णुपंत घोलप



पाटोदा (प्रतिनिधी) शेकापच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड यांना शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप आणि इतरांनी विविध विषयी मागण्याचे निवदेन दिले. या मध्ये जातीय सलोखा अबाधीत राखण्यासाठी आपण भ्रष्ट पुढारी आणि जातीवादी नेते यांना लगाम घालणे बाबत., बालाघाटावर उज्वल भविष्य करण्यासाठी उंच अशा गहिनीनाथ गडाजवळ गोदावरी खो-यातील पाणी टाकण्यासाठी मांजरा हे नवीन उपखोरे तयार करुन बीड जिल्ह्यासह अहिल्यानगर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील १८ ते २० तालुक्याला उपसा जलसिंचन योजना तयार करणे बाबत., बीड जिल्ह्यातील बालाघाटच्या कुशीत वसलेल्या परळी, अंबेजोगाई, धारुर, वडवणी, बीड, शिरुर, पाटोदा आणि आष्टी या तालुक्यातील डोंगराळ भागातील गावांचा पुर्नरसर्व्हे करुन डोंगरी विकास योजनेत समाविष्ठ करणे बाबत., २०२३ सालातील सतत पावसाच्या खंडामुळे आणि २०२४ सालातील सततच्या पावसामुळे शेतक-यांच्या खरीप पिकाचे झालेले नुकसान त्यावर विमा कंपनीकडुन झालेल्या नुकसानीच्या किती टक्के विमा कोणकोणत्या पीकासाठी मंजुर केला तो अद्याप मिळाला नसले बाबत., विधानसभा निवडणुकीत शेतक-यांची संपुर्ण कर्जमाफी घोषित केली होती त्याची अंमलबजावणी करणे बाबत , महाराष्ट्र ग्राम पंचायतीच्या नगर पंचायत झाल्या त्यामुळे केंद्र आणि राज्याच्या कित्येक योजनेपासुन शेतकरी वंचित राहत असले बाबत. (त्यामध्ये कांदाचाळ, शेडनेट, कडबाकुट्टी, ठिबक व तुषार सिंचन, टॅक्टर व त्या वरील अनुदान मिळते परंतु जनसिंचन विहिर, गाई गोठा, पांदणरस्ते आणि इतर मिळत नसले बाबत), गेल्या कित्येक दिवसापासुन मांजरा नदीवर पाटोदा शहरालगत ता.पाटोदा जि.बीड येथील जलसंधारण विभागा अंतर्गत को.प.बं.क्र.११ ला विशेष बाब म्हणून शासनाने मंजुरी देणे बाबत., २०१५ साली पाटोदा येथे दुष्काळात काम मागण्यासाठी आलेल्या मोर्चेक-यामधील ५० मजुरावर ३५३ आणि इतर कलमांतर्गत खोटे गुन्हे दाखल केले ते वापस घेऊ, केलेल्या कामाचे पैसे देऊ आणि मंजुर झालेला बेरोजगार भत्ता देऊ असे लेखी आश्वासन तत्कालीन रोहयो उपजिल्हाधिकारी यांनी दिले होते ते अद्याप पुर्ण केले नाही त्यामुळे ते रोहयो मजुर जिल्हा न्यायालयात गेल्या कित्येक वर्षापासून चकरा मारत आहेत त्यांना न्याय मिळवुन देणे बाबत., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची शेतमाल तारण योजना कित्येक तालुक्याला गोडाऊन नसल्यामुळे शेतक-यांना त्या योजनेचा फायदा होत नसले बाबत., शासनाने खाद्यतेल, सोयापेंड (डीओसी) आयात केल्यामुळे गेल्या कित्येक दिवसापासुन हमी भावापेक्षा १०००/- रुपये कमी दराने सोयाबीन बाजारात विकल्या जात आहे त्यामुळे शेतक-यांचे खुप मोठे आर्थिक नुकसान झालेले असुन त्यांना भाव फरकाचे किमान क्विंटल मागे १०००/- रुपये भरपाई म्हणून देणे बाबत., पाटोदा पोलीस स्टेशनला नवीन जागा उपलब्ध करुन देणे आणि अधिकारी व कर्मचा-यांना नवीन निवासस्थानाची सोय करण्यात यावी आणि इतर विषया संदर्भात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत लेखी निवदेन देण्यात आले. आणि माहितीस्तव बीड जिल्ह्याचे खासदार व शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी दिले आहे. या वेळी शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, भाई बाळासाहेब घुमरे, भाई राजु शेख, भाई राजेंद्र नवले, भाई इमरान शेख, भाई अभि लोंढे सह इतरांची उपस्थिती होती.

## गतिशील व दायित्वपूर्ण प्रशासनाचे १०० दिवसांचे नियोजन पूर्ण करा : मेघना बोर्डीकर

नांदेड (प्रतिनिधी) नांदेड:दि.२९.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासाठी निर्धारित केलेल्या सात सूत्री शंभर दिवसाच्या कार्यक्रमाची नांदेडमध्येही गतीशील व दायित्व पूर्ण अंमलबजावणी करा,असे आवाहन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आज येथे केले.राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण,पाणी पुरवठा आणि स्वच्छता,ऊर्जा, महिला आणि बालकल्याण, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांचा नांदेड येथील आजचा प्रथम दौरा होता.त्यांनी नियोजन भवन येथे आज विविध विभागांचा आढावा घेतला. या बैठकीला खासदार अजित गोपछडे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेश डोईफोडे,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी अधीक्षक अभियंता महावितरण,महापारेषण, कार्यकारी अभियंता जलजीवन मिशन,पाणीपुरवठा विभाग, नांदेड कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नांदेड,उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग जिल्हा महिला बालविकास अधिकारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,जिल्हा परिषद. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यकारी अभियंता महावितरण व महापारेषण,वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि यंत्रणा जिल्हा समन्वयक महिला आर्थिक विकास महामंडळ आदी विभागांचा त्यांनी आढावा घेतला.खासदार अजित गोपछडे यांनीही यावेळी अनेक योजनांबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात उत्तम प्रशासनाचे १०० दिवस हा संकल्प पुढे ठेवण्यात आला आहे. ७ कलमी कार्यक्रम त्यासाठी दिला गेला आहे. या शंभर दिवसांमध्ये प्रशासनामध्ये झालेला बदल दर्शनी दिसला पाहिजे.येणाऱ्या प्रत्येक अभ्यागतांचे व्यवस्थित स्वागत झाले पाहिजे,सर्व वेबसाईट अपडेट असाव्यात, कार्यालयाची स्वच्छता व प्राथमिक सुविधा परिपूर्ण असल्या पाहिजे.

# जीबीएस आजाराचं थैमान सुरुच, साताऱ्यात चार रुग्ण आढळले; गावकरी भयभीत

पुण्यापाठोपाठ राज्याच्या इतर भागातही जीबीएस या दुर्मिळ आजाराचे रुग्ण सापडण्याचे प्रकार सुरुच आहे. पुणे,सोलापूर, नागपूर पाठापाठ आता सातारा येथे देखील जीबीएस सिंड्रोमचे चार रुग्ण सापडले आहेत.सातारा येथे १५ वर्षांच्या आतील ४ संशयित रुग्ण सापडले असून त्यांच्यावर सातारा येथील शासकीय रुग्णालयात दोन रुग्णांवर तर खाजगी रुग्णालयात एका तर कराडच्या कृष्णा रुग्णालयात एक अशा चार रुग्णांवर उपचार सुरु आहेत.चारही मुलांची प्रकृती व्यवस्थित असल्याची माहिती आरोग्य अधिका-यांनी दिली आहे. या रुग्णाची चाचणी करण्यात आली असून प्रयोग शाळेत तपासणीनंतर जीबीएस आहे की नाही याचे निदान होणार आहे.नाशिक महापालिकेचा सतर्कजीबीएस आजाराच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेचा




वैद्यकीय विभाग सतर्क झाला आहे.नाशिक महापालिकेच्या दोन रुग्णालयात विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. अतिदक्षतेचा उपाय म्हणून महापालिकेने या आजाराच्या संशयितांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना केली आहे. नाशिक महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचे डॉ. झाकीर हुसेन रुग्णालय आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ( बिटको ) रुग्णालयात विशेष कक्षाची स्थापना केली आहे. म हापालिका हद्दीत खाजगी रुग्णालयात अशा पद्धतीचे रुग्ण आढळल्यास महापालिकेला कळवण्याचे आव्हान देखील मनपाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण यांनी केले आहे .सिंहगड रोड भागात जास्त प्रादुर्भाव GBS आजाराच्या बाबत सगळ्या यंत्रणा आपापल्या ठिकाणी काम करत आहेत. ऋइड आजाराचा पुण्याच्या सिंहगड रोड भागात जास्त प्रादुर्भाव आहे. रुग्णांना दिलासा देण्याचे काम प्रशासन करत आहे. GBS वाढणार नाही यासाठी यंत्रणा प्रयत्न करत आहे. केंद्रीय पथकाने काही ठिकाणी भेटी दिल्या आहेत असे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितले. प्रयागराजमधील विमान दरांबाबत बाबत कालच बैठक झाली आहे, याबाबत निर्णय घेतला जाईल असेही त्यांनी सांगितले. एखाद्या कार्यक्रमात भेट झाल्यानंतर बोलणं होतं, तशी चंद्रकांत पाटील आणि उद्धव ठाकरे यांच्यात बोलणे झाले असेल असे मुरलीधर मोहोळ यांनी म्हटले आहे.

# मराठी पत्रकार परीषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहाता.निमत्रक मंगेश निटुरकर

बीड प्रतिनिधी मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकाऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरात, ता.निमंत्रक मंगेश निटुरकर, ता. समन्वयक लक्ष्मण नरनाळे यांनी केले आहे. हा पुरस्कार कार्यक्रम साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून या कार्यकमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गोपी लांडगे, गणेश मोकाशे,हेमंत वनजू, अविनाश भांडेकर,चंद्रकांत बरदे, विभागीय सचिव दिपक कैतके, पी.पी.कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदिप घुमटवार,शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहायक राज्य प्रसिध्दी प्रमुख भरत निगडे, राज्य महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डीजीटल मिडिया परिषदेचे राज्यप्रमुख अनिल वाघमारे, डीजीटल मिडिया परिषद कार्याध्यक्ष सनी शिंदे, डीजीटल मिडिया प्रमुख परिषद उपाध्यक्ष अनिल उंबरकर आदींची प्रमूख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील पत्रकार बांधवांनी सेलू येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहून परिषदेने आयोजित केलेल्या एकता रॅलीस सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरात, ता.निमंत्रक मंगेश निटुरकर, ता. समन्वयक लक्ष्मण नरनाळे यांनी केले आहे

## आंदोलन कार्याकडे पाठ फिरवणाऱ्या पालकमंत्र्यांचा बीडमध्ये जाहीर निषेध



बीड । प्रतिनिधी बीड येथे प्रथमच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा अजित दादा पवार पालकमंत्री बीड जिल्हा येथे आले असता बीड करांना त्यांच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा आहेत परंतु येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामान्य कार्यकर्ते व सामान्य नागरिक शेतकरी मजूर आपले प्रश्न घेऊन आले असता निवेदन घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर संविधानिक पद्धतीने आंदोलन करत असताना त्या आंदोलनात येऊन पालकमंत्री या नात्याने निवेदन घेणे व त्यांची म्हनने ऐकून घेणे अपेक्षित होते परंतु मा. अजितदादा पवार पालकमंत्री बीड जिल्हा व उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी आंदोलना कडे पाठ फिरवली आणि संविधानिक पद्धतीने आंदोलनकर्त्यांचा अपमान करण्याचे काम पालकमंत्र्यांनी केले त्यामुळे आंदोलन करते नाराज झाले व त्यांचा निषेध यासाठी सर्व आंदोलनकर्त्यांनी मिळून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणा देऊन उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित दादा पवार यांचा जाहीर निषेध करण्यात आला आंदोलनकर्त्यांचा अनादर करणाऱ्या पालकमंत्र्यांचा ताफा अडवला जाईल असे आव्हान जिल्हाध्यक्ष अशोक येडे आम आदमी पार्टी बीड डॉ. गणेश ढवळे सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट नवले शेतकरी कामगार पक्ष घुले साहेब शेतकरी कामगार पक्ष घुमरे शेतकरी कामगार पक्ष रामधन जमले इंटक जिल्हाध्यक्ष इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होत

## वृत्तपत्राचा वापर खादयपदार्थ पॅकीगसाठी बंद करा - मिलिंद सरपते

बीड -अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात दि. ०५ ऑगस्ट २०११ पासुन लागु करण्यात आला आहे. सदर कायदयाचा प्रमुख उददेश जनतेस सुरक्षित, सकस व निर्भेळ अन् उपल्ब्ध करुन देणे हा आहे. अनेकदा लोकांमार्फत बाहेरुन नाष्टा मागविला जातो त्यावेळी अन् व्यवसायिक है वडापाव, पोहे या सारखे अन्न पदार्थ न्युजपेपरमध्ये बांधुन देतात त्यामुळे जनतच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. तसेच वृत्तपत्राची शाई ही केमिकल पासुन बनविलेली असते (ड य आयसोब्युटाइल फटालेट आणि ड य इन आयसोब्युटाइल) या केमिकलचा वापर वृत्त पत्र छपाईसाठी करतात. अशा न्युजपेपरमध्ये गरम खादयपदार्थ पॅकींग करणे व ग्राहकांना देणे धोकादायक ठरत आहे. त्यामुळे भारतीय खादय सुरक्षा मानके प्राधिकरण () भारत सरकार यांनी दि. ०६/१२/ २०१६ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तरी सर्व अन् व्यवसायिक छोटे मोठे हॉटेल्स, बेकरी व्यवसायिक, स्नॅक्स सेंटर, स्वीटमार्ट, वडापाव, भजी व भेळ विक्रेते यांना सुचित करण्यात येते की, न्युजपेपरमध्ये अन् पदार्थाचे पॅकींग त्वरीत बंद करावे अन्यथा आपणाविरुध्द अन् सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन २०११ अंतर्गत योग्य ती कडक कारवाई घेण्यात यावि आशी विनंती पत्र सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केली

# घराणेशाहीत अखंड बुडालेला महाराष्ट्र हा लोकशाहीला धोरवा-प्रा.सुशीलाताई मोराळे

बीड-प्रतिनिधी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्या राज्यात फक्त चारच पक्ष शिल्लक आहेत अशी अवस्था आहे. प्रादेशिक धर्मनिरपेक्ष पक्ष मोडीत निघाले आहेत. शेतकरी कामगार पक्ष, जनता दल धर्मनिरपेक्ष, बहुजन विकास आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टी, ए एम आय एम या सर्वांचा बोऱ्या वाजला. शेकाप चा एकमेव आमदार बाबासाहेब देशमुख यांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे. बच्चुभाऊ कडू यांच्या प्रहार जनशक्तीची वाताहात झाली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हे राष्ट्रीय पक्ष आहेत. मात्र महाराष्ट्रात त्यांची वाताहात झाली आहे. मेकअपचे निकोले आमदार दुसऱ्यांदा झाले ते मात्र महा विकास आघाडी सोबत ठामपणे उभे आहेत. राष्ट्रीय काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित दादा शिवसेना उद्धव ठाकरे शिवसेना एकनाथ शिंदे जवळपास उद्धव ठाकरे यांच्या सेनेचा अपवाद सोडला तर सगळे पक्ष घराणेशाहीने बरबटले आहेत. या निवडणुकीत तर घराणेशाहीने अक्षरशः थैमान घातले आहे वाम मार्गाने पैसा कमवायचा आणि निवडणुकीत उधळायचा बोटी चपटी चा वारे माप वापर करायचा आणि आपापल्या डोळ्या टिकवायच्या इतकाच अर्थ आता लोकशाहीला लागला आहे. ज्यांच्याकडे मनी पावर आणि मसल पावर आहे त्यांनाच या पक्षांनी उमेदवारी दिल्या, बाप खासदार सून खासदार मुलगी खासदार मुल आमदार



असा हा खेळ केला गेला या खेळात माझ्यासकट अनेक प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ससेहोलपट झाली दमछाक झाली. राष्ट्रवादी पक्ष फुटला तेव्हा बीड जिल्ह्यात एकही नामांकित नेता पक्षात राहिला नाही अजितदादा सोबत गेला फक्त संदीप क्षीरसागर यांचा अपवाद सोडला तर जिल्हा रिकामा झाला होता. उषाताई दराडे, सय्यद सलीम, राजेंद्र जगताप, नारायण डक, राधाकृष्ण पाटील, सुदामती गुट्टे, पृथ्वीराज साठे, साहेबराव दरेकर अशी बोटावर मोजणे इतकीच नेतेमंडळी राष्ट्रवादी शरद पवारांसोबत राहिले जिल्ह्यातील माझे अनेक सहानुभूतीदार समर्थकांनी मला आग्रह केला आता तुम्ही पवार साहेबांच्या राष्ट्रवादीसोबत जा तुम्हाला संधी मिळेल मी धाडसी निर्णय घेतला आणि १७ ऑगस्ट २०२३ ला प्रवेश केला पक्षाचे नवे चिन्ह पोहोचविण्यासाठी भिंगरी लावून जिल्ह्यात चारशे गावात गेले लोकसभेला उमेदवारी मागितली बूथ कमिट्या केल्या. आणि अचानक बजरंग सोनवणे यांची लॉटरी लागली. पंकजाताई आणि धनंजय मुंडे यांचे खंदे समर्थक बजरंग बाप्पा एका रात्रीत त्यांनी निवडणूक सुरू व्हायला चार दिवस बाकी असताना प्रवेश केला आणि ते खासदार झाले. प्रचंड जातिवादाच्या विळख्यात सापडलेल्या निवडणुकीत त्यांचा अल्पमताने विजय झाला मी विधानसभेला आष्टी मतदार संघातून उमेदवारी मागितली ३९९ गावात संवाद सभा घेतल्या. माझ्या इतक्या संपर्क असलेला एकही उमेदवार पक्षाकडे नव्हता परंतु अचानक साहेबांच्या डोक्यात महबूब शेख बसले त्यांना उमेदवारी दिली आणि माझी राजकीय कत्तल झाली खरं म्हणजे मी एक सक्षम महिला उमेदवार होते ओबीसी प्रवर्गातून होते. पुरोगामी धर्मनिरपेक्ष म्हणून माझी प्रतिमा होती परंतु मला डावले फक्त माझा बाप आमदार मंत्री खासदार नव्हता म्हणून मला तिकीट नाकारले. हेरंब कुलकर्णी यांनी महाराष्ट्र विधानसभेत २८८ पैकी २३७ मतदार संघात घराणेशाही चे उमेदवार होते त्यापैकी ८९ उमेदवार विजयी झाले आहेत. घराणेशाहीची कीड भाजपालाही लागली ज्या शरद पवारांच्या घराणेशाहीच्या राजकारणाला बदनाम करून भाजपाने राज्यात आपला पक्ष उभा केला त्या पक्षाने तब्बल ४९ उमेदवार घराणेशाही दिले रावसाहेब दानवे यांचे चिरंजीव संतोष दानवे, आशिष शेलार विनोद शेलार भाऊ भाऊ, निलेश राणे नितेश राणे भाऊ भाऊ त्यांचे वडील नारायण राणे खासदार, विजयकुमार गावित हिना गावित बापलेक, धर्मराव बाबा आत्राम भाग्यश्री आश्रम बाप मुलगी, तुषार राठोड संतोष राठोड काका पुतण्या, राजेंद्र गावित शरद गावित काका पुतण्या, नवाब मलिक-सना मलिक बाप मुलगी, छगन भुजबळ समीर भुजबळ काका पुतणे, अजित पवार योगेंद्र पवार काका पुतणे, संजय शिंदे रणजितसिंह शिंदे काका पुतणे, हितेंद्र ठाकूर क्षितिज ठाकूर बाप मुलगा, गणेश नाईक संदीप नाईक बाप मुलगा, राजेंद्र शिंगणे गायत्री शिंगणे काका पुतणी, आदित्य ठाकरे वरून सरदेसाई अमित ठाकरे भाऊ भाऊ, किरण सामंत उदय सामंत भाऊ भाऊ, अशोक चव्हाण यांची कन्या स्वतः चव्हाण खासदार मुलगी आमदार, रोहित पवार योगेंद्र पवार अजित पवार, धारावीत एक बहीण वर्षा गायकवाड खासदार एक बहीण आमदार, विश्वजीत कदम विक्रम सिंग सावंत भाऊ भाऊ, संदीप क्षीरसागर योगेश क्षीरसागर सागर भाऊ भाऊ, किशोर पाटील वैशाली सूर्यवंशी भाऊ बहीण, संजना जाधव हर्षवर्धन जाधव पती-पत्नी, जवळपास ६१ मतदार संघ दोन घराण्यात वाटले गेले सर्वात जास्त घराणेशाही उमेदवार शरद पवार राष्ट्रवादी आणि अजित पवार राष्ट्रवादी पक्षाने दिले. शिवसेना ठाकरे व शिवसेना शिंदे यांनी मात्र १९ टक्के उमेदवार घराणेशाही दिले. सत्ता मिळाल्यानंतरही अनेक घराणी सेनेत आली असली तरी आजही उद्धव ठाकरे सेना बऱ्यापैकी आम आदमीला उमेदवारी देत आहे. भाजपाचे ३२ टक्के उमेदवार हे घराणेशाही कुटुंबातील आहेत. बऱ्याच उमेदवारांना उमेदवारी न मिळाल्यामुळे अपक्ष म्हणून लढावे लागले असे राज्यात ४२ उमेदवार होते. भंडारा जिल्ह्यात एकही उमेदवार घराणेशाहीचा नव्हता. वडील मुलगा मुलगी पती-पत्नी मावस भाऊ आते भाऊ मेहुना अशा अनेक उमेदवार उभे होते. पश्चिम महाराष्ट्रात सर्वात जास्त घराणेशाही उमेदवार आहेत विदर्भ मराठवाड्यातही मोठी संख्या आहे. मुंबईत कमी अधिक प्रमाणात घराणेशाही उमेदवार आहेत पण त्या तुलनेत ही संख्या कमी आहे मात्र मुंबईत पैशाचा पाऊस पाडणारे श्रीमंत उमेदवार मोठ्या प्रमाणात आहेत. एक मात्र नक्की या निवडणुकीत आमच्यासारख्या आयुष्यभर संघर्ष करणाऱ्यांची माती झाली मतदारांनाही याचे काही देणे घेणे नाही. प्रचंड जातिवाद धर्मवाद संगळ चंगळवादाच्या भोवऱ्यात ही निवडणूक अडकली. जात जमात वादाच आणि पार्शिंग हत्याराने देवा भाऊच्या सूक्ष्म आयोजनाने ही निवडणूक हायजॅक केली हे मात्र निश्चित.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com